कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजना (Family Planning Indemnity Scheme) संदर्भात नवीन मार्गदर्शक सूचना लागू करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन निर्णय क्रमांकः कुनिश-२०१६/प्र.क्र.१८०/कु.क.

१० वा मजला,बी विंग, गो.ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई - ०१
तारीख: १८ जुलै, २०१६

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः कुनिओ-२०१३/ प्र.क्र. ७४/कु.क., दि.०९.०५.२०१३**

२) **केंद्र शासनाचे इंग्रजी मार्गदर्शक पुस्तिका** Standards & Quality Assurance in Sterilization Service, November २०१४

**प्रस्तावना -**

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भात दाखल केलेल्या याचिकेबाबत न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार भारत सरकारने दि.२९.११.२००५ पासून देशात सर्व ठिकाणी कुटुंब नियोजन विमा योजना चालु केली होती. तद्नंतर केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजना (Family Planning Indemnity Scheme) चालू करण्यात आली. आता केंद्र शासनाने संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या नोव्हेंबर, २०१४ च्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार सदर योजनेबाबतनिविन मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदर नविन मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार या योजनेसंदर्भातील संदर्भ क्र. १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.२,५,७,८,१५ व २० मध्ये बदल करण्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय-

**मुद्दा क्र. २ कुटुंब नियोजन नुकसान भरपाई योजनेचा लभ देण्याच्या निकषांमध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.**

| भाग (Section) | लाभाची व्याप्ती ( Coverage) | मर्यादा (Limit) |
|---|---|---|
| IA | रूग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोगे कारणामुळे (Death attributable to sterilization) मृत्यू झाल्यास (Inclusive of death during process of sterilization operation) किवा रूग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर सात दिवसांच्या आत मृत्यू झाल्यास | रू. २,००,०००/- |
| IB | रूग्णालयातून डिस्चार्ज दिल्याच्या तारखेपासून ८ ते ३० दिवसांच्या दरम्यान कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोगे कारणामुळे (Death attributable to sterilization) मृत्यू झाल्यास | रू. ५०,०००/- |
| IC | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया असफल (Failure) झाल्यास | रू. ३०,०००/- |
| ID | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करतेवेळी गुंतागुंत झाल्यास (Inclusive of complication during process of sterilization operation)किंवा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्यानंतर डिस्चार्ज दिल्यानंतर ६० दिवसांच्या कालावधीत कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेशी संबंध लावण्याजोग्या कारणामुळे गुंतागुंत (Complications) झाल्यास | प्रत्यक्ष खर्च परंतु रू. २५,०००/- मर्यादेपर्यंत |
| II | कुटुंब नियोजन सेवा पुरविणारे डॉक्टर आणि शासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था , ॲक्रिडेट केलेले खाजगी रूग्णालय यांचेसाठी इन्डेमिटी (Indemnity ) प्रती डॉक्तर / संस्था प्रती वर्ष ४ प्रकरणांच्या मर्यादेत | रूपये २,००,०००/- प्रती प्रकरणाच्या मर्यादेत |

**मुद्दा क्र. ५)** राज्यात विविध स्तरावरील गुणवत्ता अभिवचन समित्या रद्द करण्यांत आल्या असून सदर समित्यांची रचना शासन निर्णय क्र.गुनिका-२०१४/प्र.क्र.२७५/आरोग्य-३दि.२२.०५.२०१५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. सदर शासन निर्णयामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिके करिता कुटुंब

कल्याण शस्त्रक्रिया संदर्भिय प्रकरणांसाठी समिती नमूद करण्यात आलेली नाही. सदर समितीची रचना पुढील प्रमाणे राहील.:-

**बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता कुटुंब कल्याण नुकसान भरपाई योजनेकरिता उपसमिती:-**

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त आयुक्त (आरोग्य ) बृहन्मुंबई महानगरपालिका | अध्यक्ष |
| २. | कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य सचिव |
| ३. | स्त्रीरोग तज्ञ, बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत रूग्णलय | सदस्य |
| ४. | शल्यचिकित्सक बृहन्मुंबई महानगरपालिका अतर्गत रूग्णालय | सदस्य |
| ५. | भूलतज्ञ, बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत रूग्णालय | सदस्य |
| ६ | विकृती विशेषज्ञ, बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत रूग्णालय | सदस्य |

त्याचप्रमाणे सदर शासन निर्णय दि.२२.०५.२०१५ मधील मुद्दा क्र. ४ मध्ये कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संदर्भीय प्रकरणांसाठी जिल्हास्तरीय उपसमितीमध्ये जिल्हा शल्यचिकित्सक यांना सदस्य सचिव असे दर्शविण्यात आले आहे, त्याऐवजी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सदस्य व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सदस्य सचिव असे संबांधण्यात यावे.

**मुद्दा क्र. ७ - कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉक्टर/तज्ञाची पात्रता:-**

| | **कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया** | **शस्त्रक्रियेचा प्रकार** | **पात्रता** |
|---|---|---|---|
| मानांकित<br>Empanelled | स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया | टाक्याची<br>( Minilap) | १.एम.बी.बी.एस. पदवीसह स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विषयक पदविका धारक ( D.G.O.) किंवा स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विषयक पदव्युत्तर पदवीधारक (M.D.)<br>२. टाक्याच्या शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण पूर्ण केलेले इतर शस्त्रक्रिया संबंधित क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (specialists in other surgical fields)<br>३. टाक्याच्या शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण पूर्ण केलेले एम. बी. बी. एस डॉक्टर |
| | पुरूष नसबंदी शस्त्रक्रिया | पारंपारीक स्वरूपाची (Conventional) | पारंपारीक स्वरूपाच्या पुरूष नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण पूर्ण केलेले एम. बी. बी. एस. आणि वर नमूद केलेले अर्हताधारक डॉक्टर्स |
| | | बिन टाक्याची (Non Scalpel Vasectomy) | बिन टाक्याची पुरूष नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण पूर्ण केलेले एम.बी.बी. एस. आणि वर नमूद केलेले अर्हताधारक डॉक्टर्स |

**मुद्दा क्र. ८ - पात्र वैद्यकिय अधिकाऱ्याची यादी तयार करणेबाबत** (Empanelment) :-

स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया व पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी उपरोक्त मुद्दा क्र.७ मधील निककषाच्या आधारे जिल्हयातील सर्व पात्र डॉक्टर्सची यादी (Panel) मुंबई जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर जिल्हयांसाठी ग्रामीण कार्यक्षेत्राकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, नागरी कार्यक्षेत्रासाठी जिल्हा शल्यचिकित्सक व महानगरपालिका क्षेत्रांसाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना तयार करावी. स्त्री शस्त्रक्रियेमधीलबिनटाका व टाका शस्त्रक्रिया आणि पुरुष शस्त्रक्रियेमधील पारंपारीक स्वरुपाची व बिनटाका (NSV) शस्त्रक्रिया अशा प्रकारासाठी प्रत्येकी स्वतंत्र यादी तयार करावी.

या यादीमध्ये शासकिय, निमशासकिय सेवेतील डॉक्टर्स व मान्यताप्राप्त (Accredited) खाजगी वैद्यकिय संस्थांमधील डॉक्टर्सचा आणि स्वयंसेवी संस्थाच्या रुग्णालयातील डॉक्टर्स (NGO) यांचा समावेश करावा. सदर यादीस जिल्हा गुणवत्ता अभिवचन समितीची मान्यता घ्यावी. शक्यतो दर ३ महिन्यांतून एकदा अथवा आवश्यकतेनुसार ही यादी अद्यावत करावी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणस पात्र असलेल्याडॉक्टरांच्या यादीमध्ये (Panel) नाव असलेलेच डॉक्टर्स शासकीय व निमशासकीय आरोग्य संस्थामध्ये, मान्यता प्राप्त (Accredited) खाजगी वैद्यकीय संस्थामध्ये आणि स्वयंसेवी संस्थाच्या रुग्णालयामध्ये कुटुंब निोजन शस्त्रक्रिया करु शकतील. एखादया राज्याच्या

/जिल्हयाच्या मान्यता प्राप्त यादीमध्ये (Panel) समाविष्ट असलेले डॉक्टर्स इतर राज्यात /जिल्हयात पात्रतेनुसार कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करु शकतील.

सदर योजनेचा लाभ शासकिय व निमशासकिय रुगणालयातील डॉक्टर्स आणि मान्यता प्राप्त (Accredited)खाजगी व स्वयसंवी संस्थेतील डॉक्टर्स यांना लागू राहील.

संदर्भ क्र.२ केंद्र शासनाचे इंग्रजी मार्गदर्शक पुस्तिका Standards & Quality Assurance in Sterilization Services November २०१४ मधील भाग ३ मध्ये परिशिष्टे दिलेली आहेत त्यांचा कुटुंब कल्याण शस्त्रक्रिये संबंधी वापर करावा. त्यापैकी परिशिष्ट क्र. १,३ व ४ चे मराठीकरण करुन अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांचे कार्यालयीन पत्र दि.०१.०६.२०१५ नुसार निर्गमित करण्यांत आलेली आहेत, त्यानुसार कार्यवाही करावी.

**मुद्दा क्र. १५- सेक्शन १ मध्ये नमूद प्रकरणांबाबत दाव्यांचा अर्ज** (Claim Form- Annexure-२०)

लाभार्थ्यांने संबंधित आरोग्य संस्थेमार्फत परिपूर्ण भरुन पुील कार्यवाहीसाठी संबंधित नोडल अधिकारी यांच्याकडे सादर करावा. लाभार्थ्याने कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया संबंधित गुंतागुंत/असफलता/मृत्यू या प्रकरणी दाव्याची कागदपत्रे घटना घडल्यापासून ९० दिवसांच्या आत नोडल अधिकाऱ्याकडे सादर करावीत.

तसेच नोडल अधिकाऱ्यांनी सदर अर्जाची व कागदपत्रांची छाननी करुन कागदपत्रे साक्षांकित करावीत. तद्नंतर सदर प्रकरण जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीपुढे पुढील कार्यवाहीसाठी ठेवावे. समितीने अर्जाची पडताळणी, वैद्यकीय मूल्यमापन करुन लाभास पात्र असलेल्या दाव्याबाबत व संबंधितांना लाभ देण्याबाबत शिफारस मुंबई जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी आणि इतर जिल्हांसाठी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीकडे करावी.

त्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित सोसायटी मार्फत व मुंबई जिल्हा व बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उपकार्यकारी अधिकारी बृहन्मुंबई महानगरपलिका यांनी संबंधित सोसायटी मार्फत लाभार्थिस प्रत्यक्ष लाभ धनादेशाद्वारे देण्याची कार्यवाही करावी. सदरहू कार्यवाही घटना घडल्यापासून ३० दिवसांच्या आत पूर्ण करावी.

सेक्शन IA व सेक्शन IB मधील मृत्यू प्रकरणांबाबत लाभार्थिच्या प्रथम कायदेशीर वारसदारास रु. ५०,०००/- सानुग्रह अनुदान जिल्हा आरोग्य सोसायटीमधून त्वरित देण्यांत यावेत. जिल्हा गुणवत्ता आश्वासन समितीने लाभासाठी शिफारस केल्यावर प्रथम सानुग्रह अनुदानाची रु.५०,.०००/- ची रक्कम बजावट करुन उर्वरित रक्कम कायदेशीर वारसदारांस देण्यात यावी.

सेक्शन IA व सेक्शन IB मधील लाभार्थिमध्ये अल्पवयीन मुले असतील तर त्यांच्या नावे धनादेश देताना पुढील endorsement करुन द्यावेत.

"Amount to be deposited as FDR in the name of mimor Sh/Ku                    till the minor attains the maturity. No premature payment of FDR is allowed. Quarterly interest may be paid to the guardian

जर लाभ देण्यासाठी हयात पती/पत्नी व अविवाहित मुले नसतील तर कायदेशीर वारसाने वारसांबाबत कायदेशीर प्रमाणपत्र सादर केल्यावर त्या वारसदारास लाभ देण्यात यावा.

तसेच सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा थेट आर्थिक लाभ लाभार्थीच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात यावा.

मुद्दा क्र. २०- या योजनेच्याबाबत भारत सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे आणि नियमांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे अंमलबजापवणी करावी. त्याचप्रमाणे कोणत्याही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७१३१३१७४६०९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: CN = Ashok Tanbaji Uike, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2016.07.18 10:37:25 +05'30'

**(अ.ता.उईके)**
**शासनाचे अवर सचिव**

प्रत,

१. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय , मुंबई.
३. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे

४. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
५. मुख्यकार्यकारी आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य/पीडीई/रुग्णसेवा) महाराष्ट्र राज्य, पुणे/मुंबई
७. सचिव, भारत सरकार, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, कुटुंब कल्याण विभाग, निर्माण भवन, नवी दिल्ली.
८. अधिष्ठाता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
९. उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
१०.उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे
११.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२.जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
१३.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१४.नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.निवडनस्ती (कु.क.).